Vowels of the People Association
Agitate | Educate | Ignite | Organize | Uplift

CIN: U85300PN2018NPL178277

contact@vopa.in
www.vopa.in

# Vowels of the People Association

**कामाचा अहवाल (ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८)**

सप्रेम नमस्कार,

नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! हे वर्ष तुम्हाला आणि तुमच्या प्रियजनांना आरोग्यपूर्ण आणि आनंददायी जावो ही सदिच्छा.

आपल्या सगळ्यांच्या साथीने आणि प्रोत्साहनाने सुरु झालेल्या *'वोव्हेल्स ऑफ द पिपल असोसिएशन'* च्या प्रवासाला आता सहा महिने पूर्ण झाले. ही संस्था सुरु करण्याचे दोन प्रमुख उद्देश आहेत.

१. वंचित समाजासाठी काम करणाऱ्या व मागास भागात काम करणाऱ्या सामाजिक संस्था तसेच गटांचे सक्षमीकरण करणे.
२. सामाजिक काम करू इच्छिणाऱ्या, दुर्बल घटकातील तरुणांमध्ये वैचारिक स्पष्टता व संविधानिक मूल्ये ह्यांची रुजवणूक करणे.

## ठळक घडामोडी:

१) या तीन महिन्यात विविध संस्थांसोबत एकूण ९ प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन केले गेले.

२) आपल्या सर्वांच्या मदतीने आम्ही आतापर्यंत खालील संस्थांसोबत संपर्कात आलो व त्यांना काही मदत करू शकलो / कशी मदत करता येईल याबाबत त्यांच्याशी चर्चा करत आहोत-

   १. सोनदरा गुरुकुलम, बीड
   २. स्नेहालय, अहमदनगर
   ३. ज्ञानसंपदा, अहमदनगर
   ४. एम.एल.ढवळे मेमोरिअल ट्रस्ट, भोपोली
   ५. स्नेहदीप जनकल्याण फाउंडेशन, पुणे
   ६. पानी फाउंडेशन
   ७. स्वच्छ, पुणे
   ८. वर्धिष्णू, जळगाव
   ९. योगेश्वरी शिक्षण संस्था, बीड

३) आम्ही आयकर विभागाकडे 12A सर्टिफिकेट मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

## पुढील आव्हाने: (याबाबत तुम्ही आम्हाला मदत करू शकता)

१. **निधी संकलन -** पुढील महिन्यापासून संस्थेला आर्थिक मदतीची जास्त निकड असून त्यासाठी देणगीदार शोधणे आणि प्रस्ताव लिहिण्याचे काम सुरु आहे. या कामात तुमची मदत अमूल्य असेल.
२. **वंचित समाजासाठी काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांच्या कामात जोडून घेणे** – मागासवर्गीय, आदिवासी, महिलांसाठी काम करणाऱ्या सामाजिक, राजकीय संस्थांशी तुमच्या वैयक्तिक ओळखी व तुम्ही त्यांना दिलेल्या या कामाबद्दल दिलेल्या संदर्भातून हे काम पुढे जाण्यास नक्कीच मदत होईल.

# कामाचा तपशील

## निषाद प्रकल्प – सामाजिक संस्था व कार्यकर्त्यांचे सक्षमीकरण

### १) सोनदरा गुरुकुलम (बीड) :

**कार्यकर्ता संख्या** – २० **विद्यार्थी संख्या** – २०० **प्रशिक्षण कार्यशाळा/ उपक्रम** – ४

बीड जिल्ह्याजवळ डोमरी येथे दुर्गम भागामध्ये सुरु असलेली 'सोनदरा' ही निवासी मुलांची शाळा आहे. उसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी सुरु झाल्याची पार्श्वभूमी लाभलेली ही शाळा मराठवाड्याचा विकास करण्याचे उद्दिष्ट जपते.

येथील कामाचा प्राथमिक हेतू हा; कामाचे प्रभावी नियोजन करणे, देखरेखीच्या व मोजमापाच्या व्यवस्था उभारणे, शिक्षकांना प्रशिक्षित करणे, व्यवस्था व प्रक्रियांमध्ये सुटसुटीतपणा आणणे, त्यांमध्ये लोकशाही मुल्ये रुजवणे, असा आहे.



१. शालेय शिक्षणात व व्यवस्थेत संगणक विभागाचा अधिक प्रभावी वापर करणे (९ ऑक्टो.)
२. मासिक प्रशिक्षण कार्यशाळा (१६ ऑक्टो.) -
   प्रभावी पाठ टाचण (लेसन प्लान) बनविणे, वर्गात शिकविणे – याचे प्रात्यक्षिक व सराव.
३. मासिक प्रशिक्षण कार्यशाळा (२१-२२ नोव्हे.) -
   वैयक्तिक आणि वैचारिक विकासासाठी सत्रे – आनंदाचे विज्ञान, जोहारी विंडो याविषयी शिक्षकांसाठी सत्रे तसेच मुख्याध्यापक व व्यवस्थापन समितीला मार्गदर्शन.
४. निधी संकलन - निधी संकलनासाठी प्रस्ताव लिहिणे, पत्रिका बनविणे, सोशल मिडिया पेज सुरु ठेवणे इ. कामात मदत.

### २) स्नेहालय (अहमदनगर) :

**कार्यकर्ता संख्या** – ३० **विद्यार्थी संख्या** – १५० **प्रशिक्षण कार्यशाळा** – २

स्नेहालय अंतर्गत HIV बाधित, अनाथ आणि निम्न सामाजिक व आर्थिक स्तरातील मुलांसाठी चालवल्या जाणाऱ्या शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आपण काम सुरु केले आहे. त्यांतर्गत वार्षिक कामाचे नियोजन, कार्यकर्त्यांचे व शिक्षकांचे प्रशिक्षण (कौशल्ये व मूल्यवर्धन), शिक्षणासाठी पोषक वातावरण निर्मिती करणे, संशोधनात्मक काम सुरु करणे इ. कामावर भर असेल. सद्य परिस्थितीचा अभ्यास व विश्लेषण करणे असा कामाचा टप्पा सध्या सुरु आहे.



१. बेसलाईन माहिती जमा करणे (२९ ऑक्टो.)
   शिक्षकांबद्दलची माहिती, प्रश्नावली व लायकार्ट मोजपट्टी वापरून गोळा केली.
२. बेसलाईन माहिती जमा करणे (१२- १३ डिसें.)
   शाळेच्या व्यवस्थापनाबद्दल प्राथमिक माहिती गोळा केली - वेळापत्रक, विविध अहवाल, उपक्रम, पाठ टाचण इ.

### ३) ज्ञानसंपदा (अहमदनगर):

**शिक्षक संख्या** – ३० **विद्यार्थी संख्या** – ६०० **प्रशिक्षण कार्यशाळा** – ४

अहमदनगर शहरातील ही एक इंग्रजी माध्यम शाळा आहे. जेष्ठ शिक्षण तज्ञ हेमाताई होनवाड यांच्या साथीने येथील शिक्षकांचे प्रशिक्षण करण्याचे काम सुरु झाले आहे.



१. गणित शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा (५ ऑक्टो.)
२. विज्ञान शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा (२३ ऑक्टो.)
३. शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा (३१ ऑक्टो.) – प्रभावी पाठ टाचण (लेसन प्लान) बनविणे
४. शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा (२४ नोव्हे.) – पाठ टाचण (लेसन प्लान) आराखडा बनविणे, व त्याचा सराव

### ४) स्नेहदीप जनकल्याण फाउंडेशन (पुणे)

**प्रशिक्षणार्थी संख्या** – ६०    **प्रशिक्षण कार्यशाळा** – १

सदर संस्था गेली ३० वर्षे पुण्यातील वस्त्यांमधील वंचित लोकांसाठी काम करत आहे. संस्थेशी संबंधीत युवक-युवतींच्या विकास प्रयत्नांमध्ये आपण त्यांना मदत करत आहोत.



१. प्रशिक्षण कार्यशाळा (२२ डिसें) – सामाजिक संस्थांमध्ये स्वयंसेवक म्हणून काम करणे, करिअर मधील संधी व व्यक्तिमत्व विकास यांचा संबंध, स्वयंसेवकांचे व्यवस्थापन, गटातील एकोपा वाढविणे याविषयी मार्गदर्शनपर सत्रे घेतली.

### इतर काही सांगण्यासारखे:

- ऋतुजा जेवे यांनी डिसेंबर २०१८ पासून संस्थेसोबत औपचारिकरीत्या काम करण्यास सुरवात केली.
- आकाश भोर यांनी एस.पी. जैन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, मुंबई येथे सामाजिक क्षेत्रासाठीचे व्यवस्थापकीय शिक्षण (PGPDM) घेण्यास सुरवात केली.
- राही मुझुमदार यांनी काही वैयक्तिक अडचणीमुळे औपचारिकरित्या काम करणे थांबवले.

आम्ही आपल्या सर्वांच्या मदतीसाठी कायमच ऋणी आहोत. प्रत्येक तीन महिन्याचा कामाचा अहवाल आम्ही आपल्यासमोर सादर करत राहू. अधिक माहितीसाठी जरूर संपर्क करा. कामाबद्दल आधीचे अहवाल वाचण्यासाठी येथे क्लिक करा.

धन्यवाद.

आपले विश्वासू,

प्रफुल्ल, आकाश, ऋतुजा

*वोव्हेल्स ऑफ द पीपल असोसिएशन टीम.*

९४०४८४१८३९, ८६०५५३७०८० (contact@vopa.in)